# जीवनाचे शिल्पकार व इतर चरित्रे

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

# जीवनाचे शिल्पकार व इतर चरित्रे : साने गुरुजी

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २८०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

## अनुक्रमणिका

- जीवनाचे शिल्पकार /५
- इतिहासाचार्य राजवाडे /२९
- रवींद्रनाथ टागोर /१११
- पं. ईश्वरचंद्र विद्यासागर /१३७
- शिशिरकुमार घोष /२४९

✦✦

# जीवनाचे शिल्पकार

# गुलामगिरी नष्ट करणारा लिंकन

''मला जेव्हा जे शक्य होईल तेव्हा या दुष्ट चालीवर मी घाव घातल्याशिवाय राहणार नाही. नक्कीच घाव घालीन.'' असे निर्धाराचे उद्‌गार लिंकनच्या तोंडून बाहेर पडले. एका स्टेशनावर निग्रो गुलाम उभे केलेले होते. त्यातील एका स्त्रीला चालवून बघत होते. जणू एखादे ढोर विकत घ्यायचे होते. आफ्रिकेतील निग्रोंना गुलाम करून अमेरिकेत आणून विकण्यात येई. त्या हालांची कल्पनाही करता येणार नाही.

जगातून ती प्रथा जात चालली होती; परंतु अमेरिकेत ती अजून होती. लिंकनच्या हातून तिला मूठमाती मिळायची होती. मानवजातीच्या या थोर उद्धारकर्त्याचा १२ फेब्रुवारी १८०९ मध्ये जन्म झाला. त्याचे आईबाप गरीब होते. वडिलांना शिक्षण कधीच मिळाले नव्हते. कारण लिंकनचे वडील सहा वर्षांचे असतानाच पितृहीन झाले होते. लिंकनची आई तो १० वर्षांचा असतानाच वारली. बापाने पुन्हा लग्न केले; परंतु सावत्र आईने लिंकनला छळले नाही. लिंकनचे नाव अब्राहम. प्रेमाने त्याला 'अबे' म्हणण्यात येई. अबे शेतात काम करी; परंतु वेळ मिळताच पुस्तके वाची. त्याला ज्ञानाचे वेड होते. तो म्हणे : ''वडिलांनी काम करणे शिकविले; परंतु कामावर प्रेम करायला नाही शिकविले.'' दिवसभर तो काम करी. कामानंतर बरोबरच्या मित्रांना किंवा मुलांना गोष्टी सांगे. एकदा एक शेजारीण म्हणाली,

''गप्पा मारतोस ! तुझे व्हायचे काय पुढे?''

''अमेरिकेचा अध्यक्ष होईन.'' तो म्हणाला.

लिंकन महत्त्वाकांक्षी होता. आरंभी लेखक व्हायची त्याची इच्छा होती. तो सृष्टीचा बाळ होता. नद्या, जंगले, हिरवे गवत, शेते-भाते यांत वाढलेला तो कविता

लिही; परंतु ते काव्य दूर राहिले आणि राजकारणातील कृतिमय काव्य लिहिणारा तो महाकवी झाला.

### राजकारणात शिरला

तो निवडणुकीस उभा राहिला. एकदा पडला; परंतु पुन्हा कधी पडला नाही. तो लोकांना आवडे. तो त्यांच्यातील होता. त्याच्या इतका जीवनाचा विविध अनुभव कोणाला होता? तो शेतमजूर, होडीवाला, लाकूडफोड्या, खाटीक, स्टोअरकीपर इ.अनेक कामांतून गेला होता. अनेक निरक्षर लोकांची तो पत्रे लिहून द्यायचा. त्यांची सुख-दुःखे तो आपल्या सोप्या भाषेत लिही. असा हा लिंकन गरिबांचा कैवारी होता. पुढे त्याने वकिलीची परीक्षा दिली.

### प्रामाणिक वकील

खोटा खटला तो कधी घेत नसे. एकदा एक पक्षकार आला व म्हणाला, ''माझा खटला कायदेशीर आहे. तुम्ही चालवा. हे पैसे मिळालेच पाहिजेत.'' लिंकन म्हणाला, ''तुमची बाजू कायदेशीर असली तरी नैतिक नाही आणि तुम्ही धट्टेकट्टे आहात. एवढे पैसे प्रामाणिक श्रमानेही तुम्ही मिळवू शकाल!''

### महत्त्वाकांक्षी पत्नी

लिंकनची आई लहानपणी वारली. एकुलती बहीण वारली. ज्या मुलीवर त्याचे प्रेम होते, तिच्याशी तो लग्न करणार होता, ती मेली. एके दिवशी वादळी पाऊस वर्षत होता. तो दुःखाने वेडा होऊन म्हणाला, ''ती या वादळात तिथे, मातीत एकटी आहे. ती एकटी कशी राहील तिथे?'' परंतु हेही दिवस गेले आणि मेरी टॉड नावाच्या एका उथळ पण महत्त्वाकांक्षी स्त्रीचे त्याने पाणिग्रहण केले. लिंकन सर्वांना आवडे. फक्त ही नखरेबाज, प्रतिष्ठित पत्नी त्याच्यावर नाराज असे. त्याचा वेडावाकडा पोषाख, ओबडधोबड वागणे तिला रुचत नसे. तो वाटेल त्याच्याजवळ बसे, बोले. कोंबड्या, डुकरे यांच्यावर चर्चा करी. ती म्हणायची, ''हमाल आणि पाणक्ये यांच्यातच वागायची तुमची लायकी !'' तो हसून म्हणे, ''मला हे सारे आवडतात; त्याला मी काय करू?''

### मुलांवर फार प्रेम

लिंकन कोमल मनाचा, प्रेमळ वृत्तीचा. त्याची मुले त्याच्या बैठकीत धुडगूस घालीत. कागद फाडीत, टाक बोथट करीत, पिकदाणी उपडी करीत. एकदा एक मित्र



म्हणाला, ''थोबाडीत द्या.'' लिंकन म्हणाला, ''खेळू द्या त्यांना. मोठेपणी त्यांनाही चिंता आहेतच.''

एकदा त्याची पत्नी चार वर्षांच्या मुलाला आंघोळ घालीत होती. तो बंबू तसाच निसटला आणि उघडानागडा रस्त्यात दूर जाऊन उभा राहिला. लिंकन पोट धरून हसू लागला. चिडलेली माता म्हणाली; ''हसता काय? जा. त्याला आधी आणा.'' लिंकनने तो ओलाचिंब बाळ उचलून आणला. त्याचे पटापट मुके घेतले.

### विचारमग्न लिंकन

परंतु लिंकन विचारात असे. कशाचे विचार? महत्त्वाकांक्षा का डोकावे? अमेरिकेचे अध्यक्ष होणे? पत्नी त्याला प्रेरणा देई. एकदा लहान मुलाला हातगाडीत घालून तो नेत होता. मूल मागे पडून रडत होते. तरी रिकामी गाडी विचारमग्न लिंकन ओढीतच होता. ते विचार मानवजातीच्या उद्धाराचे होते, गुलामगिरी दूर करण्याचे होते की, इतिहासात अजरामर होण्याचे होते? हळूहळू तो राजकारणात अधिकाधिक शिरला. १८५४ मध्ये जेफरसनने लोकशाही समतेचा पुरस्कार करणारा रिपब्लिकन पक्ष काढला. लिंकन त्या पक्षाचा महान संघटक बनला आणि १८६० मधील ती ऐतिहासिक निवडणूक आली. अध्यक्षपदासाठी चार उमेदवार होते; परंतु खरी झुंज डग्लस व लिंकन यांच्यामध्येच होती. अमेरिकाभर त्यांचे दौरे घुमले. त्या दोघांच्या दोन तिखट जिभा सारे वातावरण विद्युन्मय करीत होत्या; परंतु लिंकनच्या शब्दांत सारे हृदय होते. तो म्हणाला, ''माझे भरलेले हृदय मी ओतीत आहे.'' लिंकन निवडून आला तर आम्ही फुटू, असे दक्षिणेकडील संस्थाने म्हणू लागली. कारण 'मी गुलामगिरी रद्द करीन' असे तो म्हणे. लिंकन निवडून आला. अध्यक्षपदावर बसायला अजून अवधी होता. अजून बुचॅननच अध्यक्ष होते, तोच दक्षिण कॅरोलिनाने फुटल्याचे जाहीर केले. १८३३ मध्ये जॅक्सनने याच फुटीर वृत्तीच्या संस्थानाला ताबडतोब लष्कर पाठवून ऐक्य शिकविले होते. बुचॅनन यांनी तसे केले असते, तर फुटीर वृत्ती वाढती ना, यादवी युद्ध होते ना. परंतु बुचॅनन म्हणाला, ''संयुक्त अमेरिकेचा मी शेवटचा अध्यक्ष.'' त्याने या मध्यंतरीच्या दोन-अडीच महिन्यांत उत्तरेकडचा दारूगोळा दक्षिणेकडे जाऊ दिला. लिंकनने अध्यक्षपद हाती घेतले, तोवर सहा संस्थाने फुटली. माजी अध्यक्षाने नवीन अध्यक्षाला यादवी युद्धाची भेट दिली.

### यादवी युद्ध

उत्तरेकडच्या व दक्षिणेकडच्या संस्थानांचे यादवी युद्ध सुरू झाले. लिंकन म्हणाला, ''गुलामगिरीचा प्रश्न दूर राहो वाटलं तर; परंतु फुटून तर नाहीच निघता येणार. मी साऱ्या अमेरिकेला एकत्र ठेवू इच्छितो. गुलामगिरीचा रोग नष्ट केल्यानेच अमेरिकेचे कल्याण होईल; म्हणून मी तो दूर करू पाहात आहे.'' उत्तरेकडील नागरिकांनीही बंडाळी सुरू केली. लिंकनच्या मंत्रिमंडळातील मंत्रीही त्याला वाटेल ते बोलत. एकदा लिंकन सेनापतीला भेटायला गेला. सेनापती बाहेर गेला होता. लिंकन बसून राहिला. सेनापती आल्यावर आपल्या खोलीत गेला. लिंकनने निरोप धाडला. ''आता मी झोपतो'' उत्तर आले. लिंकन म्हणाला, ''त्याच्या घोड्यांचा लगामही मी धरीन; फक्त त्याने जय मिळवून द्यावा.''

एका मंत्र्याने त्याला 'गोरिला' म्हटले. तरीही लिंकन सारे सहन करीत होता. यादवी युद्ध फुटू पाहाणाऱ्या संस्थानांना एकत्र ठेवण्यासाठी होते; परंतु युद्ध सुरू झाल्यावर दोन वर्षांनी १८६३ च्या वर्षारंभाला गुलामगिरी नष्ट करण्याची लिंकनने घोषणा केली. यादवी युद्ध नैतिक भूमीवर गेले. जगाची सद्सद्विवेकबुद्धी जागी झाली. महत्त्वाकांक्षी लिंकन मानवजातीचा कैवारी म्हणून तळपू लागला. त्याच्याभोवती तेजोवलय पसरले. पुढे युद्ध संपले. बंडखोर संस्थाने शरण आली. लिंकनचे ते ऐतिहासिक भाषण झाले, ''झाले गेले विसरू या. सर्वांबद्दल मनात प्रेम ठेवून, कोणाचा हेवादावा न करता आपण नवा कारभार सुरू करू या.''

परंतु देवाची इच्छा निराळी

नवा कारभार सुरू होणार तो लिंकनला देवाघरचा निरोप आला. एका तरुणाने त्याच्यावर गोळ्या झाडल्या. कवी व्हिटमन म्हणाला, ''माझा सरदार, कोठे गेला माझा सरदार ?'' परंतु युद्धामुळे लिंकनबद्दल जे गैरसमज पसरले होते ते या मरणाने दूर झाले. लिंकन राष्ट्राचा पिता बनला. आपण चुकणारी मुले, असे साऱ्यांना वाटले. गांधीजी हिंदू-मुसलमानांना प्रेमाने नांदा सांगता सांगता मारले गेले. मानवजातीचे उद्धारक का अशाच मार्गाने जायचे ? सॉक्रेटिसाला विष देण्यात आले. ख्रिस्ताला क्रॉसवर चढण्यात आले. लिंकनवर गोळ्या झाडण्यात आल्या, महात्माजींनाही असेच वीरमरण! लिंकन आणि गांधीजी या दोघांची नेहमी तुलना करण्यात येते. दोघे वीरपुरुष, दोघे मानवाबद्दल प्रेम बाळगणारे ! लिंकनला शस्त्र घेऊन लढावे लागले.



१० लाख माणसे यादवीत मेली. कोणी म्हणतात, लिंकन अध्यक्षपदासाठी उभा न राहता तर युद्ध टळले असते कोणाला माहीत?

### जनतेचे प्रेम

सर्वसामान्य जनतेचे त्याच्यावर प्रेम होते. तो अध्यक्ष झाला. तेव्हा एक लहानपणची ओळखीची म्हातारी आजीबाई हातमोजे आणून म्हणाली, ''अबे, हे घे. तुझ्या अध्यक्षस्थानी हे घेऊन जा. माझ्या हाताने कातलेल्या सुताचे मी हे विणले आहेत !'' आणि लिंकनने ते प्रेमाने घेतले. सहा फूट चार इंच उंच असलेला हा वीरपुरुष विचाराने, भावनेनेही सर्वांहून उंच होता. महत्त्वाकांक्षा व उदात्तता यांचे तो मिश्रण होता. माती व प्रकाश, मर्त्यता व अमृतत्व यांचे मिश्रण म्हणजे त्याचे जीवन ! परंतु त्या जीवनात अपूर्णता, दोष, अंधार आज दिसून न येता त्या जीवनातील धीरोदात्तता व मानवजातीबद्दलचे व्यापक प्रेम याच गोष्टी सर्वांच्या डोळ्यांसमोर येतात!

✦✦✦

# जर्मन महाकवी गटे

महाकवी हे जगाचे असतात आणि विशेषतः गटे हा खरोखरच राष्ट्रातीत होता. त्याने जर्मन लोकगीतांना जी सुंदर प्रस्तावना लिहिली आहे, तीत तो म्हणतो : ''लोकांचे, विशेषतः मुलांचे इतर राष्ट्रांच्या गुणांकडे लक्ष वेधून घेण्याची वेळ आली आहे.'' गटेची वृत्ती विश्वात्मक होती. तो लहानशा वस्तूंतही विश्व पाही. 'पिंडी ते ब्रह्मांडी, ब्रह्मांडी ते पिंडी' ही भारतीय भावना गटेच्या जीवनात दिसून येते.

२८ऑगस्ट १७४९ ला दुपारी त्याचा जन्म झाला. त्याचे पणजोबा लोहार होते. आजोबा शिंपी होते; परंतु वडील पंडित होते. राज्याचे सल्लागार होते. आजोबा-पणजोबांचा धंदा त्यांनी मुलाला कधी सांगितला नाही. गटेची आई साधी, सरळ होती. पतीत आणि तिच्यात वयाचे बरेच अंतर. गटे जन्मला तेव्हा पित्याची चाळिशी उलटलेली; परंतु आई अठरा वर्षांची होती. ती लहान गटेला गोष्टी सांगे. गटे म्हणतो: ''पित्यापासून जीवनाची गंभीर दृष्टी मी घेतली. आईपासून गोष्टी सांगण्याची आवड मिळविली.''

### वैचारिक बंडखोर

अठरावे शतक क्रांतिकारक. अमेरिका स्वतंत्र झाली. फ्रेंच राज्यक्रांती झाली; परंतु जर्मनीत राजकीय क्रांती झाली नाही. तेथे वैचारिक बंड झाले. ल्यूथरने पूर्वी पोपविरुद्ध बंड जर्मनीतच केले. गटे वयाच्या सहाव्या वर्षी म्हणाला, ''कोठला देव नि काय !'' पित्याने त्याला लॅटिन, ग्रीक या भाषा लहानपणीच शिकविल्या. जगाचा इतिहास शिकविला. गटेने आठव्या वर्षी लॅटिन भाषेत निबंध लिहिला. अकराव्या वर्षी सात भाषांत एक कादंबरी लिहिली. चौदाव्या वर्षी प्रेमात सापडला. असा हा उच्छृंखल मुलगा वाढत होता. लिप्झिग येथील विद्यापीठात शिकत होता; परंतु आजारी पडला. मरायचाच, पण वाचला. पुढे स्ट्रासबर्ग येथे कायदेपंडित व्हायला गेला; परंतु



अभ्यासाकडे त्याचे लक्ष नसे. लहरीप्रमाणे वाची. वैद्यक, संगीत यांचाही अभ्यास करी. नवीन खेळ खेळायला शिकला. तो दिसे भव्य. नाक सरळ, मोठे. भुवया आणि डोळे आकर्षक, रुंद कपाळ. त्याला पाहताच सारे दिपून जात. तो हॉटेलात गेला तर खाणे-पिणे विसरून सारे त्याच्याकडे बघत राहात. तो स्वतः म्हणतो, ''मी यौवनाने जणू मस्त होतो.''

### अनुभवाचे सोने करी

कितीतरी मुलींवर त्याने प्रेम केले. काहींनी त्याला सोडले. त्याने काहींना सोडले. त्या त्या वेळेस ती प्रेमोत्कटता खरी असे; परंतु त्याच्या सर्व जीवनाला ती व्यापू शकत नसे. मनावरचे भार काव्यात ओतून तो पुढे जाई. मिळणाऱ्या अनुभवाचे काव्यमय सोने करी. नाटक लिहिण्यासाठी जर्मन इतिहास त्याने धुंडाळला आणि गॉट्झ् या वीरावर त्याने नाटक लिहिले. गॉट्झ् हा गरिबांची बाजू घेणारा, श्रीमंतांना नाडणारा. हे नाटक तरुणांना जणू बायबल वाटले. उच्छृंखल जीवन जगणे म्हणजे धर्म असे त्यांना वाटू लागले.

### तरुण वर्टरची दुःखे

लॉटचेन नावाच्या तरुणीवर त्याचे प्रेम बसले; परंतु तिचे दुसऱ्याशी लग्न ठरले होते. एक दिवस गटे दोघांचा निरोप घेऊन जातो; परंतु तो अति दुःखी झाला. आत्महत्या करावी असे त्याला वाटते; परंतु गटेचा फौस्ट ज्याप्रमाणे विषारी कुपी फेकून पुन्हा झगडायला उभा राहतो, त्याप्रमाणे गटे 'तरुण वर्टरची दुःखे' ही कादंबरी लिहून तो दुःखभार दूर करतो. पुढे जीवनयात्रेला निघतो. वर्टर हा प्रेमभंगामुळे आत्महत्या करतो. हे पुस्तक म्हणजे भावनांचा कल्लोळ आहे. जर्मनीत त्याच्या १६ आवृत्त्या निघाल्या. नेपोलियनने इजिप्तवर स्वारी केली तेव्हा ही कादंबरी त्याच्या खिशात होती. त्याने ती सात वेळा वाचली होती. जर्मनीतील तरुण-तरुणींना तर वेड लागले. कादंबरीतील वर्टरप्रमाणे तरुण पोषाख करू लागले. मुली कादंबरीतील नायिकेप्रमाणे नटू लागल्या. प्रेमभंग झालेले तरुण आत्महत्या करू लागले. गटेचा का हा संदेश होता ? तो तर पुढे जात होता. स्वतःचे मरण वर्टरवर सोपवून तो विजयी वीराप्रमाणे पुढे चालला.

### वायमार येथे वास्तव्य

वायमार येथील छोट्या राजाच्या दरबारात तो राहिला. वायमार त्याने साहित्याचे केंद्र बनविले. हळूहळू त्याची उन्मादक वृत्ती शांत होत होती. तो सुखी, विलासी दिसला तरी गरिबांविषयी त्याला प्रेम वाटे. तो राजाला नमस्कार करी आणि गरीब माणसांनाही करी. खाणीतील लोकांना भेटून आल्यावर तो म्हणाला : ''ज्यांना आपण खालच्या